मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# रेल्वे प्रवाशांच्या 'प्रगती'ला खो

## प्रगती एक्सप्रेसचा चिंचवडला थांबा नाही : चाकरमान्यांसाठी रेल्वेच्या वेळा गैरसोयीच्या

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड ते मुंबई प्रवास करणाऱ्या चाकरमान्यांना सध्या असणाऱ्या रेल्वेच्या वेळा गैरसोयीच्या आहेत. तसेच प्रगती एक्सप्रेसला चिंचवडला थांबा नाही. परिणामी सकाळच्यानंतर नोकरदारांना लवकर रेल्वे उपलब्ध होत नाही. चिंचवडमधून दिवसाकाठी सुमारे ९०० प्रवासी प्रवास करत आहेत. त्यांना प्रवास करणे गैरसोयीचे होत आहे.

मध्य रेल्वेच्या पुणे-मुंबई मार्गावर पिंपरी-चिंचवड शहरात दापोडी, कासारवाडी, पिंपरी, चिंचवड, आकुर्डी असे पाच रेल्वे स्थानक आहेत. शहराची लोकसंख्या २७ लाखांवर असून, दिवसाकाठी सुमारे दोन हजार प्रवासी दररोज रेल्वेने प्रवास करत आहेत. मुंबईसाठी चिंचवड रेल्वे स्थानकावरून नोकरीसाठी जाणाऱ्या चाकरमान्यांची संख्या एक हजारच्या आसपास आहे. पूर्वी सकाळच्या सत्रात सिंहगड एक्स्प्रेस, सह्याद्री एक्स्प्रेस आदी प्रवासी रेल्वे सेवा होत्या. सिंहगड एक्स्प्रेस सकाळी साडे सहाला चिंचवड येथे मुंबईला जाण्यासाठी येते. त्यानंतर सह्याद्री एक्स्प्रेस सकाळी साडे सातला पिंपरी येथे थांबायची. मात्र, कोरोनानंतर परवडत नसल्याने 'सह्याद्री' बंद करण्यात आली. त्यामुळे केवळ सिंहगड एक्सप्रेसचीच प्रवाशांना वाट पहावी लागत आहे.



### दुपारी लोकलची सुविधा नाही

» दुपारच्या वेळी एक वाजून पाच मिनिटांनी पुण्यावरून लोणावळा लोकल होती तर लोणावळ्यावरून पावणे दोनला ही सुविधा आहे. मात्र सध्या ही लोकल बंद असल्याने दुपारच्या वेळी प्रवाशांची गैरसोय होत असल्याचे रेल्वे प्रवासी संघाच्या वतीने सांगण्यात आले.

> "रेल्वेबाबतचे निर्णय केंद्रीय स्तरावरून ठरतात. प्रगतीला एक्सप्रेसला थांबा देण्याबाबतचा निर्णय तिथूनच होईल. रेल्वेचे नवीन वेळापत्रक जानेवारीमध्ये जाहीर होईल. तय वेळी तयाबाबतचा निर्णय होईल.
> - राम बरगप्पा, जनसंपर्क अधिकारी, पुणे डिवीजन रेल्वे.

> "प्रगती एक्सप्रेसला चिंचवडमध्ये थांबा असणे गरजेचे आहे. तयासाठी पत्रव्यवहार केले आहेत. मात्र थांबा दिलेला नाही. तयामुळे प्रवास करणाऱ्या नोकरदारांची गैरसोय होते. इतर रेल्वेच्या गाड्या कमी आहेत. संध्याकाळी रेल्वे कमी असल्याने शहरवासियांची गैरसोय होत आहे.
> - इक्बाल मुलाणी, अध्यक्ष, रेल्वे प्रवासी संघ, पिंपरी-चिंचवड.

सिंहगडनंतर प्रगती एक्सप्रेसची सुविधा आहे. मात्र, ही रेल्वे चिंचवडला थांबत नाही. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. या गाडीला थांबा देण्याबाबत साततयाने निवेदन दिले आहे. मात्र, अद्याप तया बाबत सकारात्मक मार्ग काढला नाही. तयामुळे अनेकांना लोकलने लोणावळ्यापर्यंत प्रवास करण्याची वेळ येत आहे. तिथून पुढे मुंबईला जावे लागत आहे. तयामुळे प्रगती एक्सप्रेसला चिंचवड येथे थांबा देण्याची मागणी होत आहे.

कोरोनापूर्वी सिंहगड एक्सप्रेसला पासधारक महिलांसाठी स्वतंत्र बोगीची सुविधा होती. मात्र, कोरोनामध्ये ही बोगी बंद करण्यात आली आहे. तयामुळे महिलांची गैरसोय होत आहे. साततयाने मागणी करूनही अद्याप ही सुविधा सुरू करण्यात आली नाही.

---

# तळेगाव तिहेरी हत्याकांड : माय लेकरांचा युद्धपातळीवर शोध सुरू

## एनडीआरएफ, वन्यजीव रक्षकांच्या पाच टीम नदीमध्ये उतरल्या, गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपींना केली अटक

**पिंपरी | प्रतिनिधी**

नराधम प्रियकराने प्रेयसीच्या मृतदेहासह तिच्या दोन चिमुरड्या मुलांना नदीमध्ये फेकून दिले. ही धक्कादायक घटना सोमवारी (दि. २२) तळेगाव दाभाडे येथे उघडकीस आली. दरम्यान, एनडीआरएफ आणि वन्यजीव रक्षकांच्या एकूण पाच टीम नदीमध्ये उतरल्या असून मायलेकरांचा शोध युध्दपातळीवर सुरू आहे.

समरीन निसार नेवरेकर (वय २५), ईशांत (वय ५ वर्ष), आणि इजान (वय २ वर्ष) अशी शोध सुरू असलेल्या माय लेकरांची नावे आहेत. याप्रकरणी आरोपी गजेंद्र जगन्नाथ दगडखैर (३७, रा. समता कॉलनी, वराळे, मावळ), रविकांत भानुदास गायकवाड (४१, रा. डॉन बॉस्को कॉलनी, ईश्वरानंद सोसायटी, सावेडी, अहमदनगर) यांना पोलिसांनी अटक केली आहे.



### एनडीआरएफ, वन्यजीव रक्षकांच्या टीमकडून शोध मोहीम सुरु

» या घटनेचे तीव्र पडसाद समाजाच्या सर्व स्तरावर उमटले असून सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. मृत समरीन नेवरेकर हिच्या नातेवाईकांनी आरोपींना फाशीची शिक्षा द्या, अशी मागणी केली आहे. दरम्यान, समरीन हिच्या मृतदेहासह दोन चिमूरड्या मुलांना शोधण्यासाठी एनडीआरएफ आणि वन्यजीव रक्षकांच्या पाच टीम नदीमध्ये उतरल्या आहेत. सायंकाळी उशिरापर्यंत टीमकडून शोधकार्य सुरू होते.

> एनडीआरएफ आणि वन्यजीव रक्षकांच्या टीमकडून दिवसभर शोध मोहीम घेण्यात आली. पावसामुळे पाण्याचा प्रवाह वाढला आहे. त्यामुळे नदी किनारी असलेल्या गावातील सर्व ग्रामस्थांना याबाबत सूचित करण्यात आले आहे. बुधवारी (दि. २४) सकाळी पुन्हा शोधकार्य सुरू करण्यात येणार आहे.
> - प्रदीप रायन्नवार, वरिष्ठ निरीक्षक, तळेगाव दाभाडे.

इंद्रायणी नदीत फेकून मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्लॅन त्यांचा ठरला. त्यानुसार, इंद्रायणी नदीत आरोपींनी समरीनचा मृतदेह फेकला. आईला फेकल्याचे पाहून दोन्ही मुले मोठमोठ्याने रडू लागली. त्यामुळे नराधम आरोपींनी दोन्ही मुलांना देखील जिवंतपणे नदीत फेकून दिले. या प्रकरणी गुन्हा दाखल करून पोलिसांनी आरोपींना अटक केली आहे.

# खराडी आयटी पार्कमधील रस्त्यांची झाली चाळण

## आयटी पार्क म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खराडी भागातील रस्त्यांची पालिका अधिकाऱ्यांच्या ढिसाळ कारभारामुळे रस्त्याला तळ्याचे स्वरूप

**पुणे | प्रतिनिधी**

आयटी पार्क म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खराडी भागातील रस्त्यांची पालिका अधिकाऱ्यांच्या ढिसाळ कारभारामुळे वाट लागली असून दोन दिवस पडणाऱ्या संततधार पावसामुळे या भागातील रस्त्यांची चाळण झाली आहे.

रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे परिसरातील वाहतुकीची समस्या गंभीर बनली आहे. खराडी परिसरात सातव वस्ती परिसरात एका खासगी संस्थेच्या शाळेकडे जाणाऱ्या मार्गावरच रस्त्यातच भला मोठा खड्डा पडून या रस्त्याला तळ्याचे स्वरूप आले आहे.

साचलेल्या पाण्यातून मार्ग काढताना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दीड महिन्यापूर्वी धानोरी लोहगाव मार्गावरील पोरवाल रोड परिसरात स्कूल वाहनाचा अपघात होऊन अनेक विद्यार्थी जखमी झाले होते. या अपघाताची पुनरावृत्ती होते की काय, अशी भीती विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये निर्माण झाली आहे. यावर पालिका अधिकाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची उपाययोजना केली जात नसल्याने हे अधिकारी विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळत असल्याचा आरोप पालकांकडून करण्यात येत आहे.



### परिस्थिती 'जैसे थे'

» महापालिकेचे आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी पूरपरिस्थिती निर्माण झालेल्या शहरातील विविध भागात पाहणी केली. यानंतर त्यांनी नाल्यासह पावसामुळे तुंबलेल्या ड्रेनेजलाईन साफ करण्याचे आदेश दिले होते. या घटनेला दीड महिना उलटूनदेखील पालिकेचे कोणीही अधिकारी या परिसरात न फिरकल्यामुळे येथील परिस्थिती 'जैसे थे' आहे. यामुळे महापालिका अधिकाऱ्यांबद्दल नागरिकांच्या मनात प्रचंड नाराजी आहे.

लँगस्टन सोसायटी परिसरात पडलेल्या पावसामुळे पालिकेकडून बनविण्यात आलेले रस्तेच उखडून गेल्याने रस्त्यांवर खड्डे की खड्ड्यात रस्ते हा प्रश्न परिसरातील नागरिकांना सतावत आहे. हा मार्ग वाहनचालकांना रात्रीच्या सुमारास अपघाताचे निमंत्रण देत आहे. खराडी गावठाण परिसरातदेखील अशा प्रकारची परिस्थिती निर्माण झाली आहे. येथील रस्त्यांना बसविण्यात आलेले गट्टू उखडून गेले आहेत. पंढरीनगर भागातील सोसायटीमधील रहिवाशांना रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे घराबाहेर पडणे कठीण झाले आहे. दीड महिन्यापूर्वी झालेल्या पहिल्या मुसळधार पावसामुळे आपलं घर सोसायटी आणि तुळजाभवानीनगर भागातील अनेक घरांत पावसाचे पाणी शिरून नागरिकांच्या घरातील साहित्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. अनेकांचे संसार यामुळे उघड्यावर आले होते.

नागरिकांना महापालिकेकडून प्रथम नोटीस पाठवून नंतर त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. ही तत्परता नागरिकांच्या कामाबाबत का दाखवली जात नाही, असा बिनतोड सवाल येथील नागरिक उपस्थित करीत आहेत.

> दीड महिन्यापूर्वी पडलेल्या पावसामुळे आपलं घर सोसायटी भागातील नागरिकांचे अतोनात नुकसान झाले होते. त्यावेळेस पालिका अधिकाऱ्यांनी तत्काळ समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, अधिकारी न आल्यामुळे हे आश्वासन हवेत विरले आहे.
>
> **- सुलतान मुलानी, स्थानिक पेपरविक्रेते, खराडी.**

> पालिका अधिकाऱ्याकडे वारंवार तक्रार करूनदेखील अधिकारी रस्त्यांची समस्या सोडवण्यास टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे अधिकाऱ्यांच्या हेतूविषयी शंका निर्माण होत आहे.
>
> **- अविनाश देशमुख, रक्षकनगर सोसायटी, खराडी.**

> रस्त्याबाबत नागरिकांच्या समस्या आमच्याकडे येत आहेत. छोट्या रस्त्यांची डागडुजी आमच्याकडून होत आहे. पण मुख्य रस्त्यांच्या समस्यांसंदर्भात येणाऱ्या तक्रारी आम्ही पालिकेच्या पथ विभागाकडे वर्ग करत आहोत.
>
> **- गणेश भोयर, अभियंता, नगररोड क्षेत्रीय कार्यालय, रामवाडी.**

# नॉन प्रॅक्टिस अलाऊन्स घेऊन खासगी सेवा करणारे डॉक्टर रडारवर, सहा डॉक्टरांना नोटीस!

## नॉन प्रॅक्टिस अलाऊन्स घेऊन खासगी सेवा करणाऱ्या पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागातील डॉक्टरांना कारणे दाखवा नोटीस बजावली

**पुणे | प्रतिनिधी**

पालिकेच्या आरोग्य सेवेत काम करणारे अनेक डॉक्टर नॉन प्रॅक्टिस अलाऊन्स ( एनपीए) घेतात. हे डॉक्टर पगाराच्या ३५ टक्के अतिरिक्त रक्कम नॉन प्रॅक्टिस अलाऊन्स म्हणून घेतात. त्यामुळे त्यांना खासगी रुग्णालयात किंवा स्वत:चे रुग्णालय थाटून प्रॅक्टिस करता येत नाही. काही डॉक्टर कोंढवा, चंदननगर, चाकण, किवळे येथे खासगी प्रॅक्टिस करीत आहेत. महापालिकेच्या आरोग्य विभाग एनपीए घेऊन डॉक्टर खासगी प्रॅक्टिस करत नाहीत असा दावा करतात. मात्र, अनेक डॉक्टरांनी समाज माध्यमांवर, गुगल मॅपवर आपल्या क्लिनिकचे लोकेशन टाकले आहे. त्यामुळे आरोग्य विभाग दर तीन महिन्याला डॉक्टरांकडून लिहून घेत असलेला करारनामा केवळ दिखावा असल्याचे दिसून येते.

महापालिकेच्या आरोग्य विभागात स्त्रीरोग, बालरोग, भूलतज्ज्ञांसह सर्जन, प्लॅस्टिक सर्जरी करणारे वर्ग १ मधील तज्ज्ञ वीस ते पंचवीस डॉक्टर तर वर्ग -२ मधील दीडशे डॉक्टर सेवेत आहेत. तज्ज्ञ डॉक्टरांना दरमहा दीड लाखांपेक्षा अधिक पगार आहे. यामध्ये त्यांच्या पगाराच्या ३५ टक्के अतिरिक्त रक्कम नॉन प्रॅक्टिस अलाऊन्स ( एनपीए) म्हणून दिले जाते. मात्र, अनेक डॉक्टर शहरातील मोठ्या रुग्णालयात वैद्यकीय सेवा बजावत आहेत. काही डॉक्टरांनी आपली स्वत:ची रुग्णालये थाटली आहेत. त्यांची प्रसिध्दीसुद्धा त्यांनी समाजमाध्यमांवर केली आहे..



### कारवाईची उत्सुकता

» पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागाने ३० जून २०२४ मध्ये डॉक्टरांकडून खासगी व्यवसाय करीत नसल्याचे शंभर रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र लिहून घेतले आहे. यामध्ये विशेषतज्ज्ञ, परिमंडळ व क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी, फिजिओथेरपिस्ट, दंतवैद्य यांच्याकडून प्रतिज्ञापत्र लिहून घेतले आहे. असे असले तरीही काही डॉक्टर खासगी प्रॅक्टिस करीत असल्याचे दिसून आले आहे. आता यांच्यावर काय कारवाई होणार याची उत्सुकता महापालिकेतील डॉक्टरांनाच लागली आहे.

पुणे महापालिकेची ५० दवाखाने, वीस प्रसूतिगृहे आहेत. कमला नेहरू, राजीव गांधीसारखी मोठी रुग्णालये आहेत. महापालिकेच्या कमला नेहरू व राजीव गांधी रुग्णालयात शस्त्रक्रिया विभाग आहेत. या ठिकाणी कुटुंब नियोजनापासून इतर लहान-मोठ्या शस्त्रक्रिया केल्या जातात. उपनगरांमधील महापालिकेचे ५० दवाखाने व २० प्रसूतिगृहे आहेत. या ठिकाणी बाह्यरुग्ण विभाग, बालकांचे लसीकरण केले जाते. काही ठिकाणी क्षयरोग, दंतचिकित्सा, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे उपक्रम राबविले जातात. या ठिकाणी कार्यरत असलेले डॉक्टर काही तासात काम संपवून आपल्या रुग्णालयात हजर होतात. अनेक डॉक्टरांनी व्हिजिटिंग कार्ड, गुगल मॅपवर आपल्या क्लिनिकचे लोकेशन टाकले आहे.

> "पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागातील डॉक्टरांकडून दर तीन महिन्याला नॉन प्रॅक्टिस अलाऊंस (एनपीए) संदर्भात बंधपत्र (बॉंड) भरून घेतो. मात्र, काही डॉक्टर बाहेर खासगी प्रॅक्टिस करीत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे."
>
> **- डॉ. कल्पना बळिवंत, आरोग्य प्रमुख, पुणे महानगरपालिका.**

# नेहमीची होत असतो विजेचा लपंडाव!

## पिंपळे सौदागर, रहाटणी परिसरात खंडित वीजपुरवठ्याने रहिवासी त्रस्त : दाब कमी-अधिक झाल्याने विद्युत उपकरणे जळण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

ऐन पावसाळ्यात विजेच्या अखंड पुरवठ्याने रहिवासी त्रस्त झाले आहेत. त्यातच विजेच्या कमी-अधिक दाबामुळे विद्युत उपकरणे जळून खराब होण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. पिंपळे सौदागर, रहाटणी या परिसरात चांगल्या सुविधा आणि प्रशस्त रस्ते आहेत. मोठ्या सोसायटीही उभारल्या जात आहेत. मात्र, महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे येथील रहिवाशांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. या समस्येवर लवकरच तोडगा काढावा, अशी मागणी रहिवाशांकडून होत आहे.



पावसाळ्यामध्ये पुण्यासह पिंपरी-चिंचवड शहरात विजेची समस्या उद्भवू नये, यासाठी देखभाल-दुरुस्ती करण्यात आली होती. त्यासाठी पावसाळ्यापूर्वी सर्व काम पूर्ण करण्यात आली असल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले. मात्र, पावसाळ्यामध्ये विविध ठिकाणी खंडित वीजपुरवठा, कमी दाब, तांत्रिक बिघाड आणि सातत्याने येणाऱ्या अडचणींमुळे महावितरणचे पितळ उघडे पडले होते. पिंपळे सौदागर, रहाटणी या परिसरात गेल्या दोन-तीन दिवसांपासून विजेच्या समस्येने नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच महावितरणच्या अधिकाऱ्यांना तक्रार करून देखील समस्या सोडवली जात नसल्याचे स्थानिक नागरिक सांगतात.

> विजेच्या समस्येबाबत अधिकाऱ्यांना तक्रारीची दखल घेण्याबाबत सूचना केल्या आहेत. त्याचा आढावा मी स्वतः घेतो. संबंधित ठिकाणी तशी कोणतीही तक्रार नाही. तरी या ठिकाणची पाहणी करून समस्या लवकरात लवकर दूर केली जाईल.
>
> **- सोमनाथ मुंडे, कार्यकारी अभियंता, पिंपरी विभाग.**

या परिसरात मोठ्या प्रमाणात लोकवस्ती आहे. त्याचप्रमाणे अनेक मोठ्या सोसायट्यांच्या उभारणीचे काम सुरू आहे. मात्र महावितरणच्या विजेच्या विविध समस्याने रहिवासी नव्हे तर, व्यापारीही त्रस्त झाले आहेत. व्यापाऱ्यांना मोठ्या प्रमाणात वीज बिल भरूनही ही समस्या भोगावी लागते. विजेचा दाब अचानक वाढल्याने विजेवर चालणारी उपकरणे जळण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे अनेकदा रात्री झोपण्यापूर्वी फ्रिज, टीव्ही, ओव्हन अशी उपकरणे करावी लागत असल्याचे रहिवासी सांगतात. त्याचप्रमाणे व्यापारी व उद्योजकांनादेखील महागड्या मशिनरी खराब होण्याची भीती वाटत आहे. या परिसरात रस्ते आणि पायाभूत सुविधा महापालिकेने दिल्या आहेत. मात्र अद्याप विजेच्या समस्येचे निराकरण करण्यात आलेले नाही. या ठिकाणच्या सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी अनेक तक्रारी केल्या आहेत. मात्र त्यावरती ठोस उपाययोजना होताना दिसून येत नाहीत. त्यामुळे महावितरणच्या विरोधात नाराजीचा सूर आहे.

# लगबग शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडणुकांची

## सुसूत्रतेसाठी घेतला निवडणूक प्रक्रियेचा निर्णय : 31 जुलैपर्यंत चालणार प्रक्रिया, आतापर्यंत 60 शाळेत झाली निवडणूक

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या शाळांमधील शाळा व्यवस्थापन समितीत निवडणुकीचा हंगाम सुरू आहे. समितीच्या कार्यकाळात आणि निवड प्रक्रियेत सुसूत्रता आणण्यासाठी ही निवडणूक घेण्यात येत आहे. महापालिका शाळांची गुणवत्ता वाढीसह मूलभूत सोयी सुविधांसह सुधारणांसाठी पालकांचा सहभाग महत्त्वाचा ठरणार आहे.




पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने सर्व शाळांमध्ये शाळा व्यवस्थापन समितीच्या निवडणुका घेण्यात येत आहेत. या निवडणुकांची प्रक्रिया १५ जून २०२४ रोजी सुरू झाली. तर ३१ जुलैपर्यंत चालणार आहे. या समितीच्या कार्यकाळात आणि निवड प्रक्रियेमध्ये सुसूत्रता आणण्यासाठी ही निवडणूक घेण्यात येत आहे. तसेच आतापर्यंत ६० शाळांमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत.

बालकांच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम-२००९ नुसार प्रत्येक शाळेने शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करणे आवश्यक आहे. शाळा व्यवस्थापन समितीमध्ये ७५ टक्के टक्के पालकांचा तर उर्वरित २५ टक्के मुख्याध्यापक, महापालिका सदस्य, शिक्षक, शिक्षण किंवा बालविकासतज्ज्ञ यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त, समिती सदस्यांपैकी किमान ५० टक्के महिला असणे आवश्यक असून समितीचे अध्यक्ष पालकांमधूनच निवडले जाणार आहेत.

दरम्यान, शाळा व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया सुव्यवस्थित करणे, सर्व शाळांमध्ये व्यवस्थापन समितीच्या कार्यकाळाची एकाच वेळी सुरुवात सुनिश्चित करणे, महापालिका शाळांमध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती सुधारणे तसेच आरोग्य, सुरक्षितता आणि समुदाय सहभागही वाढवणे हे कामकाज करावे लागणार आहे.

शाळा व्यवस्थापन समितीचे कार्य...

शालेय कामकाज व्यवस्थित चालण्यासाठी सहकार्य करणे.

शाळाबाह्य, विकलांग अशा बालकांचा शोध घेऊन त्यांना शाळेत दाखल करणे व त्यांचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होत असल्याची खातरजमा करणे.

शाळेच्या जमाखर्चाचा वार्षिक लेखा तयार करण्याची व्यवस्था करणे.

शालेय गुणवत्ता विकासामध्ये येणाऱ्या अडचणींचे निरसन, शाळेचा विकास करणे.

शालेय उपक्रम व अध्ययन प्रक्रिया यांमध्ये सक्रिय सहभाग घेणे.

शाळा स्तरावर येणाऱ्या अडचणींवर समिती सदस्यांनी एकत्रित येऊन काम करणे. शाळा व्यवस्थापन समिती शाळेच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करेल, महिला पालक, विशेष मुले आणि मुलींसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करेल आणि विद्यार्थ्यांची वाहतूक सुरक्षितता सुनिश्चित करेल.

**महापालिकेच्या वतीने समितीसाठी उपक्रम...**

**१) निधीची तरतूद:**

१५० विद्यार्थी संख्या - ६० हजार रुपये

१५१ ते ५०० विद्यार्थी संख्या - ८० हजार रुपये

५०० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या - १ लाख रुपये - २०२४-२५ शैक्षणिक वर्षापासून, महापालिका नव्याने निवडून आलेल्या शाळा व्यवस्थापन

समिती निधी उपलब्ध करून देईल.

**२) निधीचा उद्देश:**

शिक्षण व्यवस्थापनाचे विकेंद्रीकरण करणे.

पालक आणि शाळांना स्वायत्तता प्रदान करणे.

शाळांच्या सर्वांगीण विकासासाठी मदत करणे.

विशिष्ट शालेय स्तरावरील गरजा आणि आव्हानांना सामोरे जाण्यासाठी.

**३) निधी वापरासाठी मार्गदर्शक तत्त्वे:**

शैक्षणिक सुधारणा करणे.

अध्यापन-शिक्षण पद्धतीवर भर देणे.

पालक आणि समुदाय प्रतिबद्धता.

पायाभूत सुविधांच्या गरजा पूर्ण करणे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करणे.

**४) निधीवाटप:**

प्रत्येक शाळेतील एकूण विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार निधीचे वाटप केले जाणार.

# पालिकेकडून कारवाईचा बुलडोझर जोरात

## कोंढवा खुर्द, कौसरबाग, वडगाव, धायरीतील 37 हजार चौरस फूट बेकायदा बांधकाम हटवले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेचे अतिक्रमणावरील कारवाईचे सत्र सुरूच असून सोमवारी (दि. २२) कोंढवा खुर्द मुख्य रस्ता, कौसरबाग परिसर, वडगाव, धायरी परिसरात सुमारे ३७ हजार चौरस फूट बेकायदा बांधकामासह अतिक्रमण हटविण्यात आले.



पुणे महापालिकेच्या हद्दीत शहरासह उपनगर भागात अतिक्रमण वाढल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत तक्रारी आल्यानंतर महापालिकेच्या बांधकाम विभाग, अतिक्रमण आणि आकाशचिन्ह विभागाने संयुक्त कारवाई करण्याचे सत्र सुरू केले आहे. कोंढवा खुर्द मुख्य रस्ता, कौसरबाग परिसर, वडगाव व धायरी परिसरात फ्रंट मार्जिन व साइड मार्जिनची सुमारे ३७ हजार चौरस फूट इतके बेकायदा बांधकामासह अतिक्रमण जमीनदोस्त केले.

महापालिकेच्या झोन २ आणि झोन ५ ने सोमवारी ही संयुक्त कारवाई केली. कोंढवा खुर्द मुख्य रस्ता, कौसरबाग परिसर येथे फ्रंट मार्जिन आणि साइड मार्जिनची सुमारे २२ हजार चौरस फूट इतक्या क्षेत्रावर ही कारवाई करण्यात आली. तसेच यावेळी ८० नोटिसा देण्यात आल्या. तसेच वडगाव आणि धायरी परिसर येथे फ्रंट मार्जिन आणि साइड मार्जिनची सुमारे १५ हजार चौरस फूट कारवाई करण्यात आली. यावेळी तीन नोटिसा देत पत्रा शेडचे कच्चे बांधकाम पाडण्यात आले.

पोर्शे कार अपघात प्रकरणानंतर आणि ड्रग्ज पार्टी रंगल्यानंतर शहरात धडक कारवाईचे सत्र सुरू करण्यात आले आहे. त्यानंतर पुणे शहरातील प्रत्येक ठिकाणी वाढत्या अतिक्रमणावर कारवाई करण्याची मागणी नागरिकांनी तसेच राजकीय नेत्यांनी केली होती. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिल्यानंतर पुणे महापालिकेच्या बांधकाम विभागाने कारवाई केल्यानंतर अतिक्रमण विभागाने धडक कारवाई सुरू केली आहे.

पुण्यातील वाढत्या अतिक्रमणावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी चिंता व्यक्त केली होती. याबाबतच्या अनेक नागरिकांनी तक्रारी मोहोळ यांच्याकडे नागरिकांनी केल्या होत्या. त्यानंतर मोहोळ यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांची बैठक घेत राजकीय दबावाला बळी न पडता थेट कारवाईचे निर्देश दिले आहेत. तसेच कोणत्याही राजकीय व्यक्तीचा फोन आला तरी कारवाई थांबवू नका, असे सांगण्यात आले आहे.

येरवडा-कळस-धानोरी क्षेत्रीय कार्यालय, विश्रांतवाडी रस्ता, शिवाजीनगर-घोले रोड क्षेत्रीय कार्यालय-जंगली महाराज रस्ता, एफ.सी.रस्ता परिसर, सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालय-सिंहगड रस्ता, वानवडी-रामटेकडी क्षेत्रीय कार्यालय-शिवरकर रस्ता, एनआयबीएम रस्ता, भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालय-नेहरू रस्ता या ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे.

पुणे महापालिकेच्या हद्दीतील पदपथ, फ्रंट मार्जिन, साईड मार्जिनमधील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, अनधिकृत बोर्ड, बॅनर, होर्डिंग निर्मूलन कारवाईचे नियोजन करण्यात आले आहे. महापालिका आयुक्त यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी., शहर अभियंता प्रशांत वाघमारे, अतिक्रमण विभागाचे प्रमुख माधव जगताप, राजीव नंदकर यांच्या आदेशाने कारवाई सुरू करण्यात आली आहे. यापुढेही अशी संयुक्त कारवाई मोहीम चालू राहणार आहे. ज्या नागरिकांनी किंवा व्यावसायिकांनी अनधिकृत अतिक्रमण केले असतील त्यांनी स्वतःहून काढून घेऊन पुणे महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन अतिक्रमण विभागाने केले आहे.

### कारवाई सुरूच राहणार

» शहरातील नागरिकांना अतिक्रमणाचा सामना करावा लागत आहे. शहरातील मध्यवर्ती पेठांसह, बाजारपेठेशिवाय इतर रस्त्यांवर अतिक्रमणे वाढली आहेत. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून जाताना जीव मुठीत धरून जावे लागत आहे. त्यावर केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुणे महापालिका प्रशासनाला राजकीय दबावाला बळी न पडता थेट कारवाईचे निर्देश दिले होते. त्यानंतर महापालिकेने शहरातील पाच झोनमध्ये अतिक्रमण कारवाईच्या नियोजनाचा आराखडा तयार केला आहे. त्यानुसार शहरात २३ जुलैपर्यंत थेट कारवाई केली जाणार होती. परंतु आता २३ तारखेनंतरदेखील कारवाई सुरूच राहणार असल्याचे महापालिका प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# पुणे जिल्ह्यातील बिबटे जाणार गुजरातला

## बिबट्या निवारा केंद्रावरदेखील ताण वाढला : नव्या निवारा केंद्रांचे प्रस्तावदेखील जागेअभावी प्रलंबित

**पुणे | प्रतिनिधी**

जिल्ह्यात बिबट्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, बिबट्या निवारा केंद्रावरदेखील ताण वाढला आहे. याशिवाय नव्या निवारा केंद्रांचे प्रस्तावदेखील जागेअभावी प्रलंबित आहेत. परिणामी, बिबट्यांची संख्या वाढत असल्याने नागरी वस्तीत हल्ले वाढत आहेत. या पार्श्वभूमीवर वन आणि महसूल विभागाने तातडीने प्रलंबित प्रस्ताव मार्गी लावावेत. रिलायन्स समूहाने गुजरातमधील जामनगर येथे 'वनतारा' या वन्य प्राण्यांची काळजी व संवर्धन प्रकल्पास किंवा इतर केंद्रांना पाहिजे असल्यास नियमानुसार कार्यवाही करून पुणे जिल्ह्यातील बिबटे द्यावेत, अशी सूचना राज्याचे उपमुख्यमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केली.



जखमी झालेल्या आणि कायमस्वरूपी विकलांग झालेल्या बिबट्यांना उपचारासाठी जुन्नरमधील माणिकडोह बिबट्या निवारा केंद्रात आणण्यात येते. या केंद्राची क्षमता ४० एवढी आहे. अलीकडच्या काही वर्षांत जिल्ह्यातील ग्रामीण भागात बिबट्यांचा वावर वाढल्याच्या घटना वारंवार समोर येत आहेत. बिबट्यांकडून हल्ल्यांचे प्रमाणदेखील वाढले आहे. बिबट्यांच्या हल्ल्यात नागरिकांचा जीव गेला असून, अनेक जण जखमी झाले आहेत. जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यात नागरिकांना जीव मुठीत धरून वावरावे लागत आहे. नुकतेच जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी जुन्नर तालुक्यातील गावे 'बिबट आपत्तीप्रवण क्षेत्र' म्हणून जाहीर केली आहेत. या पार्श्वभूमीवर जुन्नर तालुक्यात नव्याने बिबट्या निवारा केंद्राच्या रखडलेल्या प्रस्तावाबाबत स्थानिक आमदार अतुल बेनके यांनी जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) बैठकीत प्रश्न उपस्थित केला. त्यावर चर्चा होऊन पालकमंत्री पवार यांनी, अतिरिक्त बिबटे नियमानुसार आणि गरज असल्यास 'वनतारा' प्रकल्पात पाठविण्याबाबत कार्यवाही करण्याची सूचना केली.

दरम्यान, जुन्नर आणि आंबेगाव या केवळ दोन तालुक्यांत बिबट्यांची संख्या ६०० पेक्षा अधिक आहे. त्यामुळे या तालुक्यात नव्याने बिबट्या निवारा केंद्र आणि जखमी वन्य प्राण्यांवर उपचार केंद्र उभारण्याबाबत वन विभागाने प्रस्ताव तयार केला आहे. प्रस्तावित जागा जलसंपदा विभागाची असून, जलसंपदा विभागाला जागेबाबत मागणी केली.